# वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक,
गडचिरोली दि. १८/०३/२०१७

मालेवाडा हे गाव कुरखेडा तालुक्यातील अतिदुर्गम व लोकसंख्येने मोठया गावांपैकी एक. याठिकाणी पोलीस, शिक्षक, वनविभाग, महसुल विभागाचे कर्मचारी वास्तव्यास आहेत. मालेवाडा येथे राष्ट्रीयक्रूत बॅंकेची सुविधा उपलब्ध नसल्याने मालेवाडा परिसरातील ६० ते ६५ गावातील नागरिकांना ग्रामिण बॅंक, डीसीसी बॅंक यांचेवर अवलंबून राहावे लागत होते. तसेच २५ ते ३० किमी. अंतरावरील कुरखेडा, धानोरा या तालुक्याच्या ठिकाणी पायपीट करावी लागत होती. शासकीय कर्मचारी व नागरिकांचा होणारा त्रास लक्षात घेवून पोमके मालेवाडा व मालेवाडा गावातील ग्रामस्थांव्दारे गेली २ वर्षापासून भारतीय स्टेट बॅंकेस मालेवाडा येथे एटीएम मशिन अथवा ग्राहक सेवा केंद्र सुरु करणेबाबत पत्रव्यवहार करण्यात आला होता. त्याचप्रमाणे मा. आमदार श्री. कृष्णाजी गजबे यांना निवेदन देण्यात आले होते. यातच नोव्हेंबर २०१६ मध्ये करण्यात आलेल्या नोटाबंदीमुळे नागरिकांच्या त्रासात भर पडल्याने राष्ट्रियक्रूत बॅंकेच्या मागनीने जोर धरला होता. या मागणीस दिनांक १६/०३/२०१७ रोजी यश आले. मालेवाडा येथे भारतीय स्टेट बॅंकेचे ग्राहक सेवा केंद्र सुरु करण्यात आले. यामुळे नागरिकांना राष्ट्रियक्रूत बॅंकेत खाते उघडणे, आपल्या खात्यावर वीस हजार रुपयांपर्यंत रक्कम काढणे, जमा करणे, रक्कम ट्रान्सफर करणे शक्य होणार आहे. भारतीय स्टेट बॅंक ग्राहक सेवा केंद्राचे उद्‌घाटन प्रसंगी केंद्र चालक भुनेश घरते, सरपंच सौ. उर्मिलाताई पेंदाम, पोमके मालेवाडाचे प्रभारी अधिकारी श्री. अजित कणसे, पोउपनि श्री. रामदास जाधव, मा. पंचायत समिती सदस्य श्री. बोगा साहेब, ग्रामपंचायत सदस्य व मोठया प्रमाणात ग्रामस्थ उपस्थित होते.




भारतीय स्टेट बैंक
ग्राहक सेवा केंद्र
NICT




STATE BANK OF INDIA
NICT
ग्राहक सेवा केंद्र
COSTOMER SERVICE POINT